# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्रमांक : २०७ / २०१२

**"ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक"** दरवर्षी पदवीप्रदान समारंभामध्ये देण्यात येते. हे सुवर्णपदक एप्रिल/मे २००६ च्या परीक्षेपासून देण्यात येत असून विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास दरवर्षी आलटून—पालटून देण्यात येते.

सन २०११—२०१२ या शैक्षणिक वर्षासाठी हे सुवर्णपदक विज्ञान विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थ्यास हे सुवर्णपदक देण्यात येणार आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सन २०११—१२ या शैक्षणिक वर्षामध्ये विज्ञान विद्याशाखेअंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विशेष गुणवत्ता प्राप्त एका विद्यार्थ्याची शिफारस खालील नियम व अटींच्या अधिन राहून **दिनांक १० ऑक्टोबर, २०१२ पूर्वी** पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावी

**''ह. भ. प. योगमहर्षी, राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलार मामा सुवर्णपदकाच्या'' नियम व अटी :**

१) सुवर्णपदकाचे नांव — ''ह. भ. प. योगमहर्षी, राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलार मामा सुवर्णपदक''

२) पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास हे सुवर्णपदक देण्यांत येईल.

३) सदर पारितोषिक प्रथमवर्षी विज्ञान विद्याशाखा व दुसऱ्या वर्षी विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात येईल.

४) हे सुवर्णपदक एप्रिल/मे, २००६ च्या परीक्षेपासून देण्यात येईल.

५) इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षेतील गुण हे प्रथम वा द्वितीय क्रमांकाच्या पात्रतेचे असावेत.

६) विद्यार्थी भारतीय संस्कृती, आचार, विचार, भारतीय परंपरा मानणारा व त्याचे स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारा असावा.

७) विद्यार्थी सर्व भारतीय व परदेशी क्रीडा तसेच वैयक्तिक व सांघिक अशा क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीतजास्त पारितोषिके मिळविलेला असावा. यामध्ये ध्यानधारणा, प्राणायाम, योगासने करणाऱ्यास प्राधान्य दयावे.

८) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेला असावा.

९) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहिम तसेच एड्स रोगाविरुध्द जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

१०) विद्यार्थी शाकाहारी व निर्व्यसनी असावा.

११) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा विचार करण्यात येईल.

१२) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्याला अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१३) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारा विद्यार्थी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

पदव्युत्तर प्रवेश विभाग }
संदर्भ क्र. : प.प्रवेश/ ४४०१ }
दिनांक : २१.०.२०१२ }

Desktop/shelar_chnga/1-4